मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दिनांक १४ मार्च २०२४ । पान १

# पुणे जिल्ह्याच्या माउली कोकाटेकडून इराणचा अली चितपट

## अडीच मिनिटात ढाक डावावर केले चितपट; श्री नागेश्वर महाराज कुस्ती आखाडा

**। पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
श्री नागेश्वर महाराज भंडारा उत्सव व श्री भैरवनाथ महाराज यात्रेतील निकाली कुस्त्यांमधील शेवटच्या कुस्तीचा ढाक या डावावर पुणे जिल्ह्याच्या माउली कोकाटेने इराणच्या अली इराणी या पैलवानाला अवघ्या अडीच मिनिंटामध्ये चितपट केले. भारत विरूध्द इराण अशा अटीतटीच्या रंगलेल्या कुस्तीची लढत पाहण्यासाठी पंचक्रोशीतील नागरिकांनी गर्दी केली होती. अखेर श्री नागेश्वर महाराजांची मानाची चांदीची गदा आणि प्रथम क्रमांकाच्या दोन लाख रुपये बक्षीसाचा मानकरी माउली कोकाटे ठरला.कुस्तीचा शेवटचा डाव सुरु होताच काही मिनिंटामध्येच प्रसिध्द कुस्ती समालोचक हंगेश्वर धायगुडे यांनी झालीझाली म्हणत अवघ्या काही सेंकदामध्येच ढाक डाव टाकून माउली कोकाटेने इराणच्या अलीला चितपट केले.मैदान मारल्याचा निकाल पंच आमदार महेश लांडगे यांनी जाहिर केला.



मागील तीन दिवसांपासून मोशीतील श्री नागेश्वर महाराज व सर्व देव देवस्थान ट्रस्टच्या वतीने श्री नागेश्वर महाराज भंडारा उत्सव व श्री भैरवनाथ महाराज यात्रेच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांमधील मंगळवारी (ता. ११) शेवटच्या दिवशी निकाली कुस्त्यांच्या आखाड्याचे आयोजन करण्यात आले होते.एकुण ६० कुस्त्या झाल्या.

त्यामधील तुषार डुबे विरुद्ध सुबोध पाटील, विजेता : तुषार डुबे- रोहित जवळकर विरुद्ध सुरज मुंढे विजयी रोहित जवळकर, अक्षय गरुड विरुद्ध प्रदिप ठाकुर, विजयी अक्षय गरुड बाळू बोरके व हनुमंत पुरी कोणीच हार मानत नव्हते म्हणून ही कुस्ती बरोबरीत सोडली. या महत्त्वाच्या कुस्ती झाली.कुस्त्यांसाठी रोहिदास आमले, सागर तांगडे, तुषार गोळे, बाळासाहेब काळजे यांनी पंच म्हणून काम केले. आखाड्यासाठी मोशीतील श्री नागेश्वर महाराज देवस्थान ट्रस्ट, ग्रामस्थांनी कष्ट घेतले एकुण २० लाख रुपयांपर्यंतच्या बक्षिसांचे वाटप करण्यात आले.

आखाड्यासाठी भीमाशंकरहून आणली लाल माती कुस्त्यांसाठी आखाड तयार करण्यासाठी भीमाशंकरहून २८ ब्रास लाल माती आणण्यात आली. या मातीमध्ये कुठलाही खडा किंवा टोचणाऱ्या वस्तू राहू नयेत, यासाठी बारीक चाळून घेण्यात आली. त्यामध्ये अनेक लिटर तेल, दूध,दही, हळद, लिंबू, फुले, पाणी मिसळण्यात आले होते.

कुस्ती पाहण्यासाठी डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे, कुमार महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज मुगधूम कोल्हापूर, अर्जुन पुरस्कार विजेते, काकासाहेब पवार, उपमहाराष्ट्र केसरी अशोक मोरे, उपमहाराष्ट्र केसरी बबन काशिद, राजाराम मुगधूम, वस्ताद जालिंदर मुंढे, शिवाजी तांगडे, बाबा बानेकर, संतोष गरूड, महान भारत केसरी विजय गावडे, स्वस्ति चौंधे, पप्पू काळभोर,पांडूरंग बनकर, दत्तात्रय गवारे या वस्तादांनी उपस्थिती लावली.

# वायसीएममध्ये महासंघ मेडिकलची सेवा पुन्हा सुरू

## महासंघ मेडिकलची सेवा ना नफा-ना तोटा या तत्वावर

**। पिंपरी-चिंचवड।**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाच्या वतीने मनपा कर्मचारी व त्यांचे कुटूंबिय आणि शहरातील गोरगरीब नागरीकांना सवलतीच्या दरात औषधे उपलब्ध करुन देण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्व. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाचे महासंघ मेडिकल्स हे औषधांचे दुकान बुधवारी (दि.१३) पुन्हा सुरु करण्यात येत आहे. ही सेवा ना नफा-ना तोटा या तत्वावर यापूर्वी दि. ०८ फेब्रुवारी २०१५ पासून सुरु करणेत आली होती. परंतु न्यायालयीन प्रक्रीयेमध्ये मागील काळात सेवा खंडीत होती. आता महासंघ मेडिकलची सेवा सर्वांसाठी अविरतपणे सुरु करण्यात आली आहे अशी माहिती पिंपरी चिंचवड मनपा कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष शशिकांत ऊर्फ बबनराव झिंजुर्डे यांनी दिली.बुधवारी वाय.सी.एम. रुग्णालयाच्या चाणक्य हॉलमध्ये आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेमध्ये अधिक माहिती देताना झिंजुर्डे यांनी सांगितले की, सन २०१९ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाची निवडणुक झाली व सदर निवडणुकीमध्ये अंबर चिंचवडे यांचे सह त्यांचा संपुर्ण पॅनल विजयी झाला व सदर मेडिकल स्टोअरचा ताबा त्यांच्याकडे कामगार आयुक्त, पुणे यांचेकडील नियुक्त करणेत आलेल्या प्रशासकामार्फत सुपूर्द करण्यात आला.दिनांक २५/०२/२०२२ रोजी पुन्हा पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाची निवडणुक झाली असुन सदर निवडणुकीमध्ये शशिकांत झिंजुर्डे यांचेसह त्यांचा पॅनल विजयी झाला. वास्तविक निवडणूक झाल्यानंतर पुर्वीच्या पदाधिकाऱ्यांने नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांकडे कर्मचारी महासंघाच्या सर्व स्थावर मालमत्तांचा ताबा देणे गरजेचे होते.परंतु माहे जानेवारी २०२४ पर्यंत कोणत्याही प्रकारचा ताबा देण्यात आलेला नाही. ताबा देणेसंदर्भात वारंवार पत्रव्यवहार करणेत आला असून सदर बाबत अद्याप पर्यंत कोणतेही उत्तर महसंघास प्राप्त झालेले नाही. त्यामुळे मनपा कर्मचाऱ्यांची व शहरातील गोरगरीब नागरिकांची गैरसोय लक्षात घेता सदर मेडिकल स्टोअर पुन्हा कार्यरत करणेसाठी त्यातील औषधांची मोजदाद करणेसाठी दिनांक ०१/०१/२०२४ रोजी जाहिर नोटीस प्रसिद्ध करणेत आली व त्याअनुषंगाने सर्वात कमी दरपत्रक सादर करणाऱ्या संस्थेस मेडिकल मधील औषधे व साहित्यांची मोजदाद करण्याचे कामकाज देणेत आले. दिनांक ०९/०१/२०२४ रोजी रितसर पंचनामा व संपुर्ण छायाचित्रीकरण करुन स्टॉक ऑडीट करणेत आले.

# भाजपाचे निष्ठावंत कार्यकर्ते ॲड. मोरेश्वर शेडगे यांची महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीवर नियुक्ती

## ॲड. मोरेश्वर शेडगे गेल्या २१ वर्षांपासून सक्रिय काम करित आहेत

**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** गेले अनेक वर्षे पिंपरी चिंचवड शहरात भारतीय जनता पार्टीसाठी प्रामाणिकपणे काम करणारे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ओळखले जाणारे ॲड. मोरेश्वर शेडगे यांची भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यकारणीवर आज नियुक्ती करण्यात आली. भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोरेश्वर शेडगे यांना प्रदेश कार्यकारिणीवर नियुक्त करण्यात आल्याचे पत्र आज सुपूर्द केले.ॲड. मोरेश्वर शेडगे हे गेली अनेक वर्षे पिंपरी चिंचवड शहरात पक्ष हितासाठी व पक्षाच्या बांधणीसाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करत आहेत. अनेकदा त्यांना संधी असतानाही केवळ पक्ष हितासाठी म्हणून त्यांनी अनेक व्यक्तिगत त्याग केले आहेत. पक्षासाठी म्हणून अहोरात्र प्रयत्नशील असणारे मोरेश्वर शेडगे यांना प्रदेश कार्यकारणीवर घेऊन भारतीय जनता पार्टीने काहीअंशी न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.भारतीय जनता पक्षाच्या स्थापने पासून मोरेश्वर शेडगे यांचे वडील ज्ञानेश्वर शेडगे व चुलते शिवाजी शेडगे हे पक्षसंघटनेचे कार्य करीत आहेत. ॲड. मोरेश्वर शेडगे हे बालपणा पासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक असून संघदृष्ट्या प्रथम वर्ष शिक्षित आहेत. महाविद्यालयीन जीवनात आखिल भारतीय विद्यार्थी परीषदेचे ५ वर्षे सक्रिय कार्य केले आहे. ॲड. मोरेश्वर शेडगे हे २००२ पासून म्हणजे गेल्या २१ वर्षांपासून पक्षाचे पूर्णवेळ सक्रिय काम करित आहेत.२००२ मधे भाजप युवा मोर्चा प्रभाग अध्यक्ष, २००३ मधे भाजप युवा मोर्चा मंडल अध्यक्ष, २००६ मधे भाजप युवा मोर्चा पिंपरी चिंचवड संघठन सरचिटणीस, २००९ मधे विद्यार्थी आघाडी प्रदेशाध्यक्ष, २०११ भाजयुमो प्रदेश सचिव, २०१३ मधे भाजयुमो पिंपरी चिंचवड जिल्हाध्यक्ष व २०२० मधे भाजपा पिं.चि. जिल्हा महामंत्री या क्रमाने पक्षाच्या संघटनात्मक जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. यात विशेष बाब म्हणजे ॲड.मोरेश्वर शेडगे भाजपा युवा मोर्चाचे पिंपरी चिंचवडचे शहराध्यक्ष असतांना त्यांनी केंद्र सरकार, राज्य सरकार व महापालिकेतील भ्रष्टाचारा विरोधात केलेली आंदोलने प्रचंड गाजली आहेत. लोकसभा, विधानसभा व महानगरपालिका निवडणूका असो किंवा पुणे विद्यापीठ सिनेट निवडणूका असो या सर्व निवडणूकांमधे पक्षाच्या अनेक महत्वाच्या संघटनात्मक जबाबदाऱ्या ॲड.मोरेश्वर शेडगे यांनी अत्यंत प्रामाणिकपणे व निष्ठेने पार पाडल्या आहेत. ॲड. मोरेश्वर शेडगे पुर्णवेळ सहभागी होते व त्यावेळी त्यांनी महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली होती. णवीस यांनी ॲड. शेडगे हे पक्षाचे जुने व निष्ठावंत कार्यकर्ते असल्याने त्यांच्यावर झालेल्या अन्यायाची गांभीर्याने दखल घेत त्यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत स्वीकृत नगरसेवक केले. नगरसेवक झाल्या नंतरही पक्षाच्या २०१७ ते २०१९ दरम्यान विस्तारक योजनेत ॲड.मोरेश्वर शेडगे यांनी पक्षकार्यात स्व:ताला झोकून देत दोन वर्षे विस्तारक म्हणून मुळशी, भोसरी व चिंचवड या विधानसभांमधे वेगवेगळ्या टप्प्यांमधे काम केले आहे.ॲड.मोरेश्वर शेडगे यांच्या या नव्या नियुक्तीमुळे पक्षाच्या जुन्या व निष्ठावंत कार्यकर्त्यांमधे आनंदाचे वातावरण झाले आहे तसेच या नियुक्तीमुळे आगामी लोकसभा निवडणुकीत व विधानसभा निवडणुकीत पक्षाला निश्चितच चांगला फायदा होईल असा विश्वास पक्ष वर्तुळात व्यक्त केला जात आहे.



# पालिका विभागांमध्ये कागद विरहीत कार्यप्रणाली सुरू

## पशुवैद्यकीय विभागाच्या सुविधाही ऑनलाईन

**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड महापालिकेचा कारभार आता कागदविरहीत (पेपरलेस) होणार असून प्रशासनाने त्या दिशेने पाऊल टाकले आहे. महापालिकेत जीएसआय सक्षम ईआरपी प्रणालीमुळे सर्व कारभार ऑनलाईन करण्यावर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी शेखर सिंह यांनी भर दिला असून, विवाह नोंदणी प्रणाली, प्रेक्षागृह, नाट्यगृहे बुकींग, ग्रंथालय व्यवस्थापन प्रणाली, माहिती अधिकार प्रणाली, पशुवैद्यकीय व्यवस्थापन या विभागाच्या जीएसआय सक्षम ईआरपी प्रणालीचे अनावरण मंगळवारी स्थायी समिती सभागृहात आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजय खोराटे, उल्हास जगताप, शहर अभियंता मकरंद निकम, स्मार्ट सिटीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, मुख्य माहिती व



तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. या कार्यप्रणालीमुळे महापालिकेतील सर्व विभाग ऑनलाईन जोडण्यात येत आहेत. तसेच या प्रणालीमुळे नागरी सेवा-सुविधा, सर्व फाईल्सचे कामकाज ऑनलाईन दिसणार आहे. त्यामुळे महापालिकेतील अधिकारी – कर्मचा-यांचे श्रम वाचून व्यवहारात पारदर्शकता येणार असून फाईलला देखील दिरंगाई लागणार नाही. महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयातील विवाह नोंदणी प्रमाणपत्र, सर्व नाट्यगृहाचे बुकींग, ग्रंथालये, पशुवैद्यकीय विभागातील श्वान परवाने, माहिती अधिकार अर्ज (आरटीआय), विविध विभागाचे कागदविरहित (पेपरलेस) ऑनलाईन कामकाज करण्यात येत आहे. आतापर्यंत नऊ विभागाचे कामकाज ऑनलाईन केलेले आहे. यापुढे अन्य उर्वरित विभागाचे कामकाज देखील ऑनलाईन करण्यात येणार आहे. जीएसआय सक्षम ईआरपी प्रणालीद्वारे नागरी सुविधा, सुरक्षा, ग्रंथालय, क्षेत्रीय कार्यालये, वैद्यकीय विभाग, भांडार विभाग यासह अन्य विभागाचे कामकाज ऑनलाईन होत आहे. याद्वारे महापालिकेच्या संबंधित विभागातील यांना आपल्या विभागातील सर्व माहिती ऑनलाईन उपलब्ध होणार आहे. महापालिकेच्या सर्व कार्यालयांमध्ये जीएसआय सक्षम ईआरपी प्रणालीचा वापर सुरू केल्यास कामकाजाला गती येईल, शिवाय कामकाज संपूर्णपणे कागदविरहित होणार असल्याने अधिक सुलभता येणार आहे.

# त्यादिवशी राज ठाकरे पुण्यातून रागावून गेले

## राजीनाम्यानंतर साहेबांचा फोन आला : वसंत मोरे

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पुण्यातील फायर ब्रँड नेते म्हणून वसंत मोरे यांची ओळख होती. माजी नगरसेवक असलेल्या वसंत मोरे यांनी आपल्या हातोडा स्टाईलने पुण्यात स्वतःचे वलय निर्माण केलं होतं. मागच्या दोन वर्षांपासून त्यांचा आणि पुण्यातील पक्ष संघटनेचा वाद सुरू होता. पक्षातील वरिष्ठांकडून यावर अनेकदा तोडगा काढण्याचा प्रयत्न झाला. मात्र मंगळवारी (दि. १२ मार्च) वसंत मोरे यांनी मनसेला अखेरचा जय महाराष्ट्र केला.



यानंतर आज एबीपी माझा या वृत्तवाहिनीशी बोलत असताना मोरे यांनी राज ठाकरेंचा त्यांना फोन आल्याचं सांगितलं. मोरे यांनी पक्ष सोडल्यानंतर मनसेकडून यावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. कोणत्याही नेत्याने यावर भाष्य केलेलं नाही.मनसेचा राजीनामा दिल्यानंतर मला अनेक पक्षातील नेत्यांचे फोन आले. राष्ट्रवादी आणि शिवसेना पक्षातूनही मला संपर्क केला गेला. पण सर्वच पक्षांना मी सांगितलं की, सध्यातरी मी कोणतीही राजकीय भूमिका जाहीर करणार नाही. कारण मला ज्या त्रासातून पक्ष सोडावा लागला, त्यानंतरही ते लोक शहाणे झालेले नाहीत, ते आतादेखील माझ्या कार्यकर्त्यांना रात्री-अपरात्री फोन करून धमकावत आहेत. या सर्वातून स्थिर स्थावर झाल्यानंतर दोन दिवसांनी राजकीय भूमिका जाहीर करेल., असे वसंत मोरे यांनी सांगितलं.मनसेमधून मला अनेकांचे फोन आले. राज साहेबांचाही फोन एका पदाधिकाऱ्याच्या मोबाइलवर आला होता, असं वसंत मोरे यांनी सांगितलं. पण त्या पदाधिकाऱ्याला मी एवढंच सांगितलं की, मी हात जोडतो. पण साहेबांचा फोन मला देऊ नको. कारण आजवर संघटनेतील खरी परिस्थिती मी राज ठाकरे यांच्या कानावर घालत आलो होतो. त्यामुळे आता राजीनामा दिल्यानंतर राज ठाकरे यांच्याशी बोलून मी त्यांना दुखवू इच्छित नाही, अशी भावना वसंत मोरे यांनी व्यक्त केली.संजय राऊत यांनी वसंत मोरेंच्या राजीनाम्यावर भाष्य केलं होतं. वसंत मोरे हे रवींद्र धंगेकर यांच्याप्रमाणे चांगले कार्यकर्ते आहेत. ते स्वच्छ आहेत. त्यांनी वॉशिंग मशीनच्या दिशेने जाऊ नये, असे संजय राऊत म्हणाले होते. त्यावर प्रतिक्रिया देताना मोरे म्हणाले की, संजय राऊत यांचा काही दिवसांपूर्वी फोन आला होता. त्यावेळी आमची चर्चा झाली होती. तसेच काल त्यांचे वॉशिंग मशीनचे विधानही मी पाहिलं. एवढ्या मोठ्या माणसाने माझ्यासारख्या कार्यकर्त्यावर प्रतिक्रिया देणं, हे माझे भाग्य समजतो.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पुण्यातील फायर ब्रँड नेते म्हणून वसंत मोरे यांची ओळख होती. माजी नगरसेवक असलेल्या वसंत मोरे यांनी आपल्या हातोडा स्टाईलने पुण्यात स्वतःचे वलय निर्माण केलं होतं. मागच्या दोन वर्षांपासून त्यांचा आणि पुण्यातील पक्ष संघटनेचा वाद सुरू होता. पक्षातील वरिष्ठांकडून यावर अनेकदा तोडगा काढण्याचा प्रयत्न झाला. मात्र मंगळवारी (दि. १२ मार्च) वसंत मोरे यांनी मनसेला अखेरचा जय महाराष्ट्र केला. यानंतर आज एबीपी माझा या वृत्तवाहिनीशी बोलत असताना मोरे यांनी राज ठाकरेंचा त्यांना फोन आल्याचं सांगितलं. मोरे यांनी पक्ष सोडल्यानंतर मनसेकडून यावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. कोणत्याही नेत्याने यावर भाष्य केलेलं नाही.मनसेमधून मला अनेकांचे फोन आले. राज साहेबांचाही फोन एका पदाधिकाऱ्याच्या मोबाइलवर आला होता, असं वसंत मोरे यांनी सांगितलं.संजय राऊत यांनी वसंत मोरेंच्या राजीनाम्यावर भाष्य केलं होतं. वसंत मोरे हे रवींद्र धंगेकर यांच्याप्रमाणे चांगले कार्यकर्ते आहेत. ते स्वच्छ आहेत.

# भाजपकडून पुण्यात मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी

## सांस्कृतिक पुण्याला सुसंस्कृत खासदार मिळावा : तरडे

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
लोकसभा निवडणुकीसाठी पुण्यातून भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सरचिटणीस आणि पुण्याचे माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. भाजपाने आज त्यांच्या लोकसभा उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. या यादीत महाराष्ट्रातील २० उमेदवारांचा समावेश करण्यात आला आहे. भाजपाने यावेळी मुरलीधर मोहोळ यांना पुण्यातून लोकसभेची उमेदवारी दिली आहे. त्यामुळे मुरलीधर मोहोळ समर्थकांमध्ये आनंदाचं वातावरण आहे. लोकसभा निवडणुकीसाठी मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी मिळेल, अशी पहिल्यापासूनच चर्चा होती. मात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी राष्ट्रीय प्रचारक सुनील देवधर आणि माजी आमदार, माजी शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांची नावेदेखील चर्चेत आली होती. त्याचबरोबर माजी खासदार संजय काकडे यांनीदेखील पुण्यातून उमेदवारी मिळावी यासाठी मोर्चेबांधणी सुरू केली होती. परंतु, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री चंद्रकांत



पाटील यांचे निकटवर्तीय अशी मोहोळ यांची पक्षात ओळख आहे. अन्य पक्षातील नेत्यांबरोबरही त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. त्यामुळे मोहोळ यांनाच उमेदवारी मिळेल असा अंदाज व्यक्त केला जात होता. त्यानुसार बुधवारी मोहोळ यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. पक्षाकडून अधिकृतरित्या उमेदवारी जाहीर झाल्यावर मुरलीधर मोहोळ यांनी आनंद व्यक्त केला.मोहोळ यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत. अशातच मोहोळ यांचे मित्र आणि मराठी चित्रपट दिग्दर्शक तथा अभिनेते प्रवीण तरडे यांनीदेखील मोहोळ यांना शुभेच्छा दिल्या आहेत. तरडे यांनी फेसबूकवर एक पोस्ट लिहिली आहे. यामध्ये त्यानी म्हटलं आहे की, मित्रवर्य मुरलीधर खूप शुभेच्छा. सांस्कृतिक पुण्याला सुसंस्कृत खासदार मिळावा ही प्रत्येक पुणेकराची ईच्छा पूर्ण होण्याच्या दृष्टीने आज पहिलं पाऊल पडलं. मुरलीधर मोहोळ प्रत्येक पुणेकराची पहीली पसंती असेल यात शंका नाही. .भाजपाने जाहीर केलेल्या उमेदवारांच्या यादीनुसार हिना गावित यांना नंदुरबार, सुभाष भामरे-धुळे, स्मिता वाघ – जळगाव, रक्षा खडसे – रावेर, अनुप धोत्रे – अकोला, रामदास तडस – वर्धा, नितीन गडकरी – नागपूर, सुधीर मुनगंटीवार – चंद्रपूर, प्रतापराव चिखलीकर – नांदेड, रावसाहेब दानवे – जालना, भारती पवार – दिंडोरी, कपिल पाटील – भिवंडी, पियूष गोयल – उत्तर मुंबई, मिहिर कोटेचा – मुंबई उत्तर पूर्व, मुरलीधर मोहोळ – पुणे, सुजय विखे पाटील – अहमदनगर, पंकजा मुंडे – बीड, सुधाकर शृंगारे – लातूर, रणजीत सिंह नाईक निंबाळकर – माढा आणि संजयकाका पाटील यांना सांगलीतून लोकसभेचं तिकीट देण्यात आलं आहे.

# बारामतीतील ‘नमो महारोजगार मेळाव्या’कडे बेरोजगारांची पाठ!

## जवळपास ३० हजार जागा या नोकऱ्या नसून प्रशिक्षणार्थी पदे

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** मोठा गाजावाजा करून राज्याचे उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारातून बारामतीत आयोजित केलेल्या दोन दिवसीय नमो महारोजगार मेळाव्याकडे बेरोजगारांनी पाठ फिरवल्याचे स्पष्ट झाले आहे. या मेळाव्यात ५५ हजार जणांना रोजगार देण्याचे लक्ष्य होते, मात्र दोन दिवसांत केवळ १२ हजार ५०० जणांनाच रोजगार मिळाला. राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाच्या वतीने २ आणि ३ मार्च रोजी हा ‘नमो महारोजगार मेळावा’ आयोजित करण्यात आला होता. तथापि, या मेळाव्याला यथातथाच प्रतिसाद मिळाल्याचे स्पष्ट



झाले.या मेळाव्याच्या निमंत्रणावरून वाद झाला होता. मेळाव्यात सहभागी झालेल्या काही कंपन्यांची माहितीही ‘इंटरनेट’वर नसल्याची तसेच काही कंपन्यांच्या नावाशी साधर्म्य असलेली वेगळीच कंपनी आढळते. त्यामुळे बेरोजगारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. रिक्त जागांवर बेरोजगारांना प्रत्यक्ष नोकऱ्यांऐवजी प्रशिक्षणार्थी (ट्रेनी) पदे भरली जाणार आहेत.मेळाव्यातील जागांचा तक्ता पाहिला, तर त्यातील जवळपास ३० हजार जागा या नोकऱ्या नसून प्रशिक्षणार्थी पदे आहेत. त्यामुळे या रोजगार मेळाव्यावर माहिती अधिकार कार्यकर्ते आणि आम आदमी पक्षाचे महाराष्ट्र उपाध्यक्ष विजय कुंभार यांनी प्रश्नचिन्हे उपस्थित केले होते. या मेळाव्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा हे उपस्थित राहिले होते. या मेळाव्यातून ५५ हजार जणांना रोजगार देण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत होते. मेळाव्यासाठी ३४५ कंपन्यांनी आपल्या रिक्त जागा कळविल्या होत्या. पहिल्या दिवशी १६४, तर दुसऱ्या दिवशी ५८ कंपन्यांनी मेळाव्याला उपस्थिती लावली होती. केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या समाजकल्याण विभागाच्या विविध योजनांचा लाभ देण्याचा कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार म्हणाले, ‘‘नमो महारोजगार मेळाव्यात ५५ हजार नोकऱ्या उपलब्ध होत्या, मात्र तेवढे उमेदवार आले नाहीत. त्यामुळे साडेबारा हजार जणांना या मेळाव्यातून नोकरी मिळाली.’’

### विभागीय आयुक्तांची कबुली

» मोठा गाजावाजा करून राज्याचे उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारातून बारामतीत आयोजित केलेल्या दोन दिवसीय नमो महारोजगार मेळाव्याकडे बेरोजगारांनी पाठ फिरवल्याचे स्पष्ट झाले आहे. या मेळाव्यात ५५ हजार जणांना रोजगार देण्याचे लक्ष्य होते, मात्र दोन दिवसांत केवळ १२ हजार ५०० जणांनाच रोजगार मिळाला. राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाच्या वतीने २ आणि ३ मार्च रोजी हा ‘नमो महारोजगार मेळावा’ आयोजित करण्यात आला होता. तथापि, या मेळाव्याला यथातथाच प्रतिसाद मिळाल्याचे स्पष्ट झाले.या मेळाव्याच्या निमंत्रणावरून वाद झाला होता.

# पुणे विमानतळावरील कार्गोसेवेला पुन्हा सुरुवात

## पुण्याहून सिंगापूरला १२३ किलो वजनाचे कार्गो पाठविण्यात आले

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे विमानतळावरील आंतरराष्ट्रीय कार्गोसेवा (मालवाहतूक) पुन्हा सुरू झाली. मंगळवारी (ता. १२) पुण्याहून सिंगापूरला १२३ किलो वजनाचे कार्गो पाठविण्यात आले. प्रवासी वाहतूक करणाऱ्या विमानात कार्गो साठी जागा नसल्याचे




सांगून हवाई वाहतूक करणाऱ्या कंपन्यांनी कार्गो च्या वाहतुकीस नकार दिला. एक महिन्यापासून पुणे विमानतळावरची आंतरराष्ट्रीय कार्गो सेवा बंद होती. ‘महिनाभरातच कार्गोसेवा ठप्प’ अशा आशयाचे वृत्त ‘सकाळ’मध्ये प्रसिद्ध झाले. त्यानंतर सीमाशुल्क विभागाचे आयुक्त यशोधन वनगे यांनी सोमवारी (ता. ११) विमानतळावरील कार्गो टर्मिनलला भेट दिली. प्रशासनाबरोबर चर्चा करून मंगळवारी (ता. १२) कार्गोसेवा पुन्हा सुरू झाली. यावेळी विमानतळ संचालक संतोष ढोके यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. उपसरव्यवस्थापक (कार्गो) प्रदीप कुमार म्हणाले, ‘‘काही तांत्रिक अडचणींमुळे सेवा बंद होती. मंगळवारपासून पुन्हा सुरू झाली.’